# कोविड रुग्णालयाचे सांगलीत उद्घाटन

एरंडोली, ता. १६ : डॉ. घाटगे हॉस्पिटल सांगली व आर. आर. पाटील होमिओपॅथिक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३० बेडच्या कोविड रुग्णालयाचे उद्घाटन काल झाले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस व महापौर दिग्विजय सुर्यवंशी उपस्थित होते. महापौर व आयुक्तांच्या हस्ते कोविड वॉर्डचे उद्घाटन झाले.

या वेळी आयुक्त कापडणीस, महापौर सुर्यवंशी, डॉ. शरद घाटगे यांचे मनोगत झाले. या कोविड रुग्णालयात सांगलीतील तज्ज्ञ डॉक्टर्स, घाटगे हॉस्पिटलचे निवासी डॉक्टर्स, महाविद्यालयातील डॉक्टर्स, अनुभवी नर्सेस व विद्यार्थी काम करणार आहेत.



**सांगली : येथे कोविड रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी आयुक्त नितीन कापडणीस व महापौर दिग्विजय सूर्यवंशी आदी.**

यावेळी आर. आर. पाटील होमिओपॅथिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयकुमार भानुसे, विद्यार्थी व घाटगे हॉस्पिटलचा स्टाफ उपस्थित होता. सूत्रंचालन डॉ. पराग बापट यांनी केले.